नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २३/०५/२०२५ (शुक्रवार)**

---

## दिनांक २६/०५/२०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांच्या हस्ते चिचोली येथे नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसचे भूमिपूजन समारंभाचे मीडिया पासेस बाबत.

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे सर्व संपादक, ब्युरोचीफ, विशेष प्रतिनिधी, वृत्तपत्रे/वृत्तसंस्था/वृत्तवाहिन्या यांना कळविण्यात येते की, दिनांक २६/०५/२०२५ रोजी केंद्रीय गृहमंत्री मा. अमित शाह यांच्या हस्ते चिचोली येथे नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसचे भूमिपूजन समारंभ असुन सदर वार्तांकनाबाबत मीडिया पासेस साठी आपल्या संस्थेचे वार्ताहार व छायाचित्रकार, व्हिडिओग्राफर तसेच त्यांचे अधिनिस्त यांचे नाव कार्यालयाच्या शिफारस पत्रासह, एक पासपोर्ट साईज छायाचित्र, आधार कार्डची झेरॉक्स असे संचालक (माहिती),माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,नागपूर, जुने सचिवालय, सिव्हिल लाईन्स येथे दिनांक २४/०५/२०२५ रोजी सकाळी १०:०० वाजेपर्यंत **श्री. विनोद रापतवार, जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर — संपर्क क्रमांक ८३२९४१७१८८** यांचे कडे सादर करावे.

प्राप्त महीतीच्या आधारे संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर यांच्या कडुन एक यादी तयार करून पोलीस विभागाला पाठविण्यात येणार आहे. मा. केंद्रीय गृहमंत्री यांच्या सुरक्षा दृष्टीकोणातुन यादी मध्ये नमुद असलेल्यांनाच कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रवेश दिल्या जाणार आहे. पोलीस विभागाला प्राप्त यादीनुसार मिडीया पासेस साठी **श्री दिपक अग्रवाल, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, नागपुर विभाग , संपर्क क्रमांक ८८६००२३६९१** यांचेशी संपर्क साधावा.

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद १ आरोपी अटक,मौदा पोलीसांची कारवाई

**पोलीस स्टेशन मौदा** :— दिनांक २२/०५/२०२५ रोजी मौदा पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेती ची चोरटी वाहतूक केली जात आहे. सदर माहीतीवरून मौदा पोलीसांनी भंडारा ते नागपुर रोडवरिल दिवानका कंपनी लोहा कंपनी जवळ नाकाबंदी केली भंडारा कडुन एक दहा चक्का ट्रक क्र. एम.एच ४० ए.के ६८३७ हा येताना दिसला. पोलीसांनी चालकाला वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाने वाहन रोडच्या कडेला लावुन पळुन गेला. वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. पोलीसांनी पंचासमक्ष १) दहा चक्का ट्रक क्र. एम.एच ४० ए.के ६८३७ किंमती २५,००,०००/— रूपये व २) ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/— रूपये आणि असा एकुण २५,३०,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

नमुद प्रकरणी दहा चक्का ट्रक क्र. एम.एच ४० ए.के ६८३७ चालकावर कलम ३०३(२),३(५), ४९ भा. न्या. संहिता, सहकलम ४८ (८), ४८ (७) महा. जमीन महसुल अधिनीयम, सह कलम ४,२१ खान व खनीजे अधिनीयम, सहकलम ३ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **सदर गुन्हयाच्या तपसादरम्यान पोलीसांनी आज दिनांक २३/०५/२०२५ रोजी आरोपी वाहन चालक/ मालक नामे कार्तिक रविंद्र वाडीभस्मे , वय २२ वर्षे, रा. बासोरा, ता.जि भंडारा याला अटक केली आहे**

# अवैध शस्त्र बाळगणाऱ्या विरूध्द गुन्हा नोंद

**पो.स्टे. कन्हान** :— दिनांक २२/०५/२५ रोजी कन्हान पोलीसांना गोपनिय माहीती मिळाली की हिन्दुस्तान कॉलनी कांदी कन्हान येथे एक इसम तलवार बाळगुन लोकांना दुखापत करण्याची भिती दाखवत असतो. अशी माहीती मिळताच पोलीसांनी तात्काळ घटनास्थळी जावुन घरझडती घेवुन पंचासमक्ष विधीसंघर्ष बालाकाचे ताब्यातुन १) एक स्टीलची तलवार २) चार ॲड्रॉईड मोबाईल असा एकुण ६९५००/—रुपयांचा मुददेमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

नमुद प्रकरणी पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम ४,२५ आर्म ॲक्ट अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**